# मराठी (कुमारभारती)

## उत्तरे : सराव कृतिपत्रिका 5 वी

**प्र. 1. (अ)**

**(1)** **हॉटेल उद्योगासाठी 'न्यू एज रोबो' या कंपनीने बनवलेले रोबो**

- वेटर
- आचारी
- स्वीपर
- मॅनेजर

**(2)** **रोबोचा फायदा**

- खाण्यापिण्याचा खर्च नाही.
- पगाराचा खर्च नाही.
- कामचुकारपणाचा प्रश्न नाही.
- मानवी वेटरच्या दुप्पट काम.

**(3)** आपण करीत असलेले काम योग्य की अयोग्य, चांगले की वाईट, हे यंत्राला ठरवता येत नाही; ते माणूसच ठरवू शकतो. कारण माणसाकडे मन, बुद्धी व भावना या गोष्टी असतात. यंत्राकडे मात्र या गोष्टी नसतात. माणूस स्वत:च्या बुद्धीने, स्वत:च्या अंत:करणाने काम करतो. यंत्र हे सांगकाम्या नोकर असते. त्याला सज्जन-दुर्जन, पापी-पुण्यवान हे काहीही कळत नाही. म्हणून यंत्र कधीच मानवाची जागा घेऊ शकत नाही. कामे त्वरेने, अचूक व सफाईदारपणे करण्यासाठी यंत्र मदत करते; म्हणजे ते माणसाला पूरक आहे. ते माणसाला पर्याय ठरू शकत नाही.

**प्र. 1. (आ)**

**(1)**

(i) संत ज्ञानेश्वर यांनी मानवाच्या कल्याणासाठी केलेली विश्वप्रार्थना — पसायदान

(ii) सर्व संतांच्या प्रार्थनांमधून व्यक्त झालेली भावना — मानवता

**(2)** (i) जे खळांची व्यंकटी सांडो — माणसांच्या मनातील दुष्ट भाव नष्ट होऊ दे.

(ii) दुरिताचे तिमिर जावो — (दुरित म्हणजे दुष्कर्म.) सर्व दुष्कर्मांचा अंधार नष्ट होऊ दे.

**(3)** संत स्वत:पलीकडे जाऊन संपूर्ण जगाकडे पाहतात. त्यांना सर्व प्राणिमात्रांबद्दलच कळवळा वाटतो. त्यांना सर्व माणसे समान वाटतात; सारखीच प्रिय वाटतात. म्हणून संतमहात्मे सर्व मानवजातीचे कल्याण इच्छितात. म्हणूनच 'जो जे वांछील तो ते लाहो' असे ज्ञानदेव म्हणतात. नामदेवांना वाटते की, सर्वांच्या मनातला अहंकार नष्ट व्हावा. म्हणजे सगळेजण एकमेकाला स्वत:च्या हृदयात सामावून घेतील. संत एकनाथांना सर्वांच्याच ठिकाणी भगवद्भाव आढळतो. संत तुकाराम महाराज हे सर्वांनी एकमेकाला साहाय्य करीत परमेश्वर चरणांपर्यंत जाण्याचा मार्ग दाखवतात. सर्वच संत स्वत:साठी काहीही मागत नाहीत. ते समस्त मानवजातीसाठी, समस्त प्राणिमात्रांसाठी परमेश्वराकडे हात जोडून प्रार्थना करतात.

**प्र. 1. (इ)**

**(1)** (i) सर्व कामांची काळजीपूर्वक आखणी करणे आणि त्यानुसार कामे पार पाडणे, म्हणजे वक्तशीरपणा होय.

(ii) सध्याच्या युगात वक्तशीरपणाला पर्याय नाही; कारण वक्तशीरपणा पाळला नाही, तर स्वत:चे नुकसान होतेच; पण समाजाचेही नुकसान होते.

**(2)**

(1) **मानवी जीवन गतिमान व गुंतागुंतीचे करणारे घटक**

- शहरीकरण
- औद्योगिकीकरण

(2) (i) चूक

(ii) बरोबर.

**प्र. 2. (अ)**

**(1)** (i) 'खोदणे' या शब्दाचा कवितेतील अर्थ म्हणजे जिद्दीने आणखी प्रयत्न करणे.

(ii) गाणे असते मनी म्हणजे मनात नवनिर्मितिक्षमता असते.

**(2)**

| कवितेतील संकल्पना | संकल्पनेचा अर्थ |
|---|---|
| (i) सारी खोटी नसतात नाणी | – सगळे लोक फसवे नसतात. |
| (ii) घट्ट मिटू नये ओठ | – मनातील विचार व्यक्त करावेत. |
| (iii) मूठ मिटून कशाला म्हणायचे भरलेली | – भ्रामक खोट्या समजुती बाळगू नयेत. |
| (iv) उघडून ओंजळीत घ्यावी मनातली तळी | – मनातील सामर्थ्य व्यापक बनवावे. |

**(3)** प्रयत्नवादाने परिस्थिती बदलते हे सांगताना कवयित्री म्हणते–निराश न होता प्रयत्नपूर्वक आणखी थोडे खोद. जमिनीखाली नक्की पाणी लागेल. धैर्य न सोडता जिद्दीने प्रयत्न कर. सर्व माणसे स्वार्थी नसतात. जगात काही प्रामाणिक माणसेही असतात, हा विश्वास ठेव.

**(4)** कवयित्री आसावरी काकडे यांनी 'खोद आणखी थोडेसे' या कवितेमध्ये माणसाने प्रयत्नवादी होऊन जगण्याची उमेद धरावी, असा उपदेश केला आहे.

कवयित्री म्हणते – घट्ट ओठ मिटून दु:ख सोसत बसू नये. आपल्या मनात खोलवर एक गाणे लपलेले असते, ते शोधून काढायला हवे. हे समजावताना त्यांनी 'गळणाऱ्या पाना'चे प्रतीक वापरले आहे. शिशिर ऋतूमध्ये पानगळ होते. झाड निष्पर्ण होते. परंतु जे पान सुकून, रिते होऊन झाडापासून विलग होते, त्या पानात झाडावर असताना सोसलेल्या वेदना असतात, हे जन्माचे आर्त, आयुष्यात सोसलेल्या वेदना, त्या सुरकुतलेल्या गळणाऱ्या पानात सामावलेल्या असतात, म्हणून पुन्हा वसंतात पालवी फुटण्याची उमेद ते बाळगून असते.

गळणाऱ्या पानामधून जीवन जगण्याची उमेद पुन्हा जागृत होते, हा आशावाद या ओळींतून व्यक्त झाला आहे.

**प्र. 2. (आ)**

(1)

| वस्तू |
| --- |
| (i) कवितेचे कवी – द. भा. धामणस्कर |
| (ii) कवितेचा विषय – निर्जीव वस्तूंचा सजीवपणा |
| (iii) कवितेतून व्यक्त होणारा विचार – निर्जीव वस्तूंना आपण मन नसते असे म्हणतो. कवीच्या मते, त्यांना मन असते, भावना असते. त्या संवेदनशीलही असतात. त्यांच्या दर्शनाने त्या वापरणाऱ्याचे व्यक्तिमत्त्व लक्षात येते. म्हणून माणसाने वस्तूंशी प्रेमाने, आत्मीयतेने वागले पाहिजे. आपण माणसांशी वागतो, तसेच वस्तूंशी वागले पाहिजे, असा महत्त्वाचा विचार या कवितेतून मांडला आहे. |

(2)

| आश्वासक चित्र |
| --- |
| (i) कवितेची कवयित्री – नीरजा |
| (ii) कवितेचा विषय – स्त्री-पुरुष समानता |
| (iii) कवितेतून व्यक्त होणारा विचार – अजूनही समाजाने पूर्णपणे स्त्री-पुरुष समानता अंगीकारलेली नाही. हे निराशाजनक आहे. परंतु भावी काळ हा स्त्री-पुरुष समानतेचाच असणार आहे. म्हणून सर्वांनी स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व आतापासूनच मान्य करून ते अंगीकारले पाहिजे, असा विचार या कवितेतून मांडला आहे. |

**प्र. 2. (इ)**

**आशयसौंदर्य :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रस्थापित वर्णव्यवस्थेविरुद्ध महाड येथे चवदार तळ्याचा जो संग्राम केला आणि शोषितांवरील अन्यायाविरुद्ध लढा उभारला, त्याच्या पन्नास वर्षे पूर्तीनंतर कवी ज. वि. पवार यांनी 'तू झालास मूक समाजाचा नायक' या कवितेमध्ये आपले मनोगत व्यक्त केले आहे. मूक समाजाच्या या महानायकाला अभिवादन करताना त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव केला आहे.

**काव्यसौंदर्य :** उपरोक्त ओळींमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शब्दांची किमया व संघर्षाचा परिणाम यांची महती कथन केली आहे. चवदार तळ्यावर सर्वांसाठी पाणी खुले करताना महामानवाने जी घोषणा केली, त्या शब्दांपुढे सर्व महाकाव्ये नतमस्तक व्हावीत अशी होती. तसेच जो संघर्ष केला त्याचा प्रभाव असा पडला की, शोषितांच्या हातातल्या काठ्या जणू जहाल बंदुका झाल्या. डॉ. बाबासाहेबांचा शब्द व संघर्षाचे सामर्थ्य यातून व्यक्त होते.

**भाषिक वैशिष्ट्ये :** मुक्तछंदात (मुक्तशैली) लिहिलेली ही कविता, त्यातील ओजस्वी शब्दकळेमुळे कार्यकर्त्यांच्या काळजाला थेट भिडते. काव्यात्म पण थेट विधानांमुळे त्यातील विचार परिणामकारक झाले आहेत. 'महाकाव्याची नम्रता' व 'काठ्यांच्या बंदुका' या प्रत्येकी शांतरस व अद्‌भुतरस यांची निर्मिती करतात.

**प्र. 3.**

(1) **व्युत्पत्ती कोश :** एखाद्या शब्दाबद्दलचे कुतूहल शमवण्यासाठी आपण व्युत्पत्ती कोशाची मदत घेतो. व्युत्पत्ती कोशात आपल्याला मूळ शब्द कसा, केव्हा, कुठे निर्माण झाला हे तर कळतेच; परंतु अन्य भाषांत तो शब्द कसा आला आहे व कोणत्या रूपात आहे, हेही कळते. असा हा शब्दांचा किमयागार कसा अस्तित्वात आला हे समजून घेणे उद्‌बोधक ठरेल.

१९३८ साली मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली 'व्युत्पत्ती कोश रचनेचे कार्य हाती घ्यावे' असा ठराव या संमेलनात मंजूर करण्यात आला. कृ. पां. कुलकर्णी यांच्यावर संपादनाची जबाबदारी सोपवण्यात आली. बॅ. मुकुंदराव जयकर यांनी अर्थसाहाय्य केले आणि श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर यांनी पुरस्कृत केल्यामुळे निर्मितीस भरीव मदत केली. अखेर १९४६ साली मराठी व्युत्पत्ती कोशाचे पहिले प्रकाशन झाले.

**(2)** रेखाजींचे कार्य हे राष्ट्र घडवण्याचेच कार्य आहे. अलीकडे समाजमाध्यमांचा प्रभाव खूप वाढला आहे. त्याचे विपरीत परिणाम दिसून येतात. फेसबुकवरील गप्पांमधून अनेक समाजकंटक व्यक्ती अजाण मुलांना/मुलींना फसवतात. अशा प्रकरणांमध्ये मुलांना समजावून सांगणे खूप कठीण असते. कारण या वयात मुलांच्या भावना सैरभैर झालेल्या असतात. अशा वेळी रेखाजी त्यांना प्रेमाने समजावून सांगतात, कायद्याची भीती घालतात, पुढील आयुष्यातील भीषण परिस्थितीची जाणीव करून देतात आणि मुलांना चुकीच्या मार्गापासून दूर करण्याचा प्रयत्न करतात. रेखाजींच्या कुशल प्रयत्नांमुळे अनेक मुले गैरप्रवृत्तीला बळी न पडता पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात सामील व्हायला तयार होतात. एक प्रकारे देशाचे भवितव्य घडवण्याचे हे कार्य आहे. आपला समाज रेखाजींच्या या कार्यामुळे नेहमीच त्यांचा कृतज्ञ राहील.

**(3)** गिरिजाबाईंनी बालकांसाठीसुद्धा लक्षणीय साहित्यनिर्मिती केली. बालकांचे वय लक्षात घेऊन त्यांनी साध्या, सोप्या बालनाटिकाही लिहिल्या. साधारणपणे लहान मुलांना अद्भुतरम्य व चमत्कारांवर आधारित कथानके आवडतात, असा समज असतो. गिरिजाबाईंनी या समजाला छेद दिला. त्यांनी वास्तवावर आधारित बालनाटिका लिहिल्या. मुलांचे भावविश्व व त्यांच्या गरजा यांना प्राधान्य देऊन बालनाटिका लिहिल्या. त्यांच्या बालनाटिकांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची चित्रदर्शी शैली. त्यांच्या नाटिकांमधला प्रसंग समोर जिवंतपणे घडत आहे, असे वाटत राहते. त्यामुळे त्यांच्या बालनाटिका पाहताना प्रेक्षक खिळून बसतात. एकंदरीत त्यांच्या बालनाटिका वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

**प्र. 4. (अ)**

**(1)**

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| (i) आठवडा | आठ दिवसांचा समूह | द्विगू |
| (ii) अहिनकुल | अही आणि नकुल | इतरेतर द्वंद्व |

**(2)**

| प्रत्ययघटित | उपसर्गघटित | अभ्यस्त |
|---|---|---|
| भांडखोर<br>टाकाऊ | आहार | दंगामस्ती |

**(3)** (i) साकडे घालणे – **अर्थ :** प्रार्थना करणे.

**वाक्य :** आनंद बरा होण्यासाठी आईने देवाला साकडे घातले.

(ii) दाखला देणे – **अर्थ :** उदाहरण देणे.

**वाक्य :** बाई नेहमी रीमाच्या बुद्धिमत्तेचा शीलाला दाखला देतात.

(iii) कास धरणे – **अर्थ :** अनुसरण करणे.

**वाक्य :** नेहमी सज्जन माणसाची कास धरावी.

(iv) कंठस्नान घालणे – **अर्थ :** ठार मारणे.

**वाक्य :** बाजीप्रभू देशपांडे यांनी पावनखिंडीत शत्रूच्या सैनिकांना कंठस्नान घातले.

**प्र. 4. (आ)**

**(1)** (1)

| समानार्थी शब्द | विरुद्धार्थी शब्द |
|---|---|
| (i) अव्याहत = नेहमी | (i) कमाल × किमान |
| (ii) दुष्कर्म = दुरित | (ii) आंधळा × डोळस |

(2) (i) अपेक्षा नसताना – अनपेक्षित

(ii) ज्याचे आकलन होत नाही असे – अनाकलनीय

(3) (i) बाटली : बाटल्या

(ii) वही : वह्या

**(2)** (i) सहायक

(ii) उत्तरार्ध

(iii) अतिशयोक्ती

(iv) कल्पवृक्ष

(v) उत्पन्न

(vi) सूचना

**(3)** (i) ? → प्रश्नचिन्ह

(ii) ‘ ’ → एकेरी अवतरणचिन्ह

**(4)** (i) Reservation – आरक्षण

(ii) Children's Theatre – बालरंगभूमी

**प्र. 5. (अ), (आ) व (इ)...**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी यांची उत्तरे स्वत: लिहावीत.

या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदानपद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी **‘नवनीत मराठी प्रथम भाषा उपयोजित लेखन : इयत्ता दहावी’** या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.